# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल— pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ — पुवि/निवि/ ७५८

दिनांक १३/६/२०१४

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शिक्षक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभाग.

विषय :— तरुण संशोधक/शिक्षक प्रवासखर्च अनुदान योजनेबाबत.

महोदय/ महोदया,

पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था तसेच विद्यापीठ शैक्षणिक विभाग येथील सर्व मान्यताप्राप्त शिक्षकांना कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठाकडून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेमिनार/कार्यशाळा/परिषदा इत्यादींमध्ये संशोधन पेपर सादर करण्याकरीता उपस्थित राहण्यासाठी तरुण संशोधक/शिक्षक प्रवासखर्च अनुदान योजनेअंतर्गत अर्थसहाय्य दिले जाते. सदर अर्थसहाय्यासाठी संबंधित शिक्षकांकडून हस्तलिखीत स्वरूपांत अर्ज स्विकारले जात आहेत.

परंतू सदरहू अर्थसहाय्यासाठी विद्यापीठातील नियोजन व विकास विभागामार्फत ऑनलाईन अर्जाची प्रक्रिया दिनांक १ जुलै २०१४ पासुन कार्यान्वीत होणार असून या बदलाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. **तसेच १ जुलै २०१४ नंतर कुठलाही हस्तलिखीत अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची देखील नोंद घेण्यात यावी.**

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी पुणे विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील बीसीयुडी ऑनलाईन मधील टिचर लॉगईनचा उपयोग करण्यात यावा. ऑनलाईन अर्ज भरून झाल्यावर त्याची एक प्रत सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह (सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे) संबंधीत महाविद्यालये/संस्थेचे प्राचार्य/संचालक व विद्यापीठ शैक्षणिक विभाग प्रमुख यांचेमार्फत नियोजन व विकास विभागास जास्तीत जास्त सात दिवसांच्या आत सादर करण्यात यावी. वेळेची मर्यादा लक्षात घेता सदरहू कालावधी नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास

सोबत : मार्गदर्शक तत्वे.

# पुणे विद्यापीठ
# नियोजन व विकास विभाग

## तरूण संशोधक / शिक्षक अर्थसहाय्य योजना

**पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व संस्था व विद्यापीठ विभागामधील शिक्षक प्रवर्गातील तरूण संशोधकांना / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय परिषद / कार्यशाळा / चर्चासत्रे / विशेष प्रशिक्षण, यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रवास खर्च,** दैनंदिन भत्ता व नोंदणी फी इ. **करीता द्यावयाच्या अर्थसहाय्याबद्दल मार्गदर्शक तत्वे:—**

१. अर्जदाराचे वय ५० वर्ष अथवा त्यापेक्षा कमी असावे. या योजनेअंतर्गत ३ वर्षातून जास्तीत जास्त एकदा अर्थसहाय्य देण्यात येईल.

२. एकदा अर्थसहाय्याचा लाभ घेतल्यानंतर संबंधित शिक्षक पुढील तीन वर्षे तरूण संशोधक व अनिर्देशित अनुदान योजनेतून अर्थसहाय्यासाठी पात्र राहणार नाही.

३. अर्जदारास एकाच परिषदेस उपस्थित राहण्याकरिता अनुदान प्राप्तीसाठी एकाच वेळी अनिर्देशित अनुदान व या योजनेअंतर्गत असे दोन अर्ज सादर करता येणार नाहीत.

४. शैक्षणिक कार्यासाठी परदेशी प्रवास फक्त आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या परिषदा कार्यशाळा / चर्चासत्रे / विशेष प्रशिक्षण, यासाठी असलेल्या प्रस्तावांचाच विचार या योजनेअंतर्गत करण्यात येईल. विहीत मार्गदर्शक तत्वानुसार पात्र ठरलेल्या अर्जदारास गुणवत्तेनुसार व मुल्यांकनानुसार कमाल १००% पर्यंत प्रवास खर्च, दैनंदिन भत्ता, नोंदणी फी, व्हिसा फी व स्थानिक वाहतूक खर्च (कार्यक्रमाशी संबंधीत स्थानिक व विदेशी प्रवास खर्च) देण्यात येईल. तसेच सदर प्रवासाचे तिकीट तीन आठवडे अगोदर (Economic Excursion Class) घेतलेले असावे.

५. आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय परिषदेमध्ये शोधनिबंध सादर करण्यासाठी व परिषदेस उपस्थित राहण्यासाठी या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यासाठी दाखल केलेल्या प्रस्तावांवर विचार विनिमय होऊन ज्या तरूण शिक्षक/संशोधकांनी परिषदेमध्ये त्यांचे शोधनिबंध सादर केले आहेत त्यांच्या प्रस्तावांचे मूल्यांकन संबंधित विषय तज्ञांकडून केले जाईल.या तज्ञांच्या शिफारशीनुसार समिती अनुदानासंबंधी अंतिम निर्णय घेईल.

६. चर्चासत्र/कार्यशाळा/परिषदेचे माहिती पत्रक व परिषद/चर्चासत्र/कार्यशाळा आयोजित करणाऱ्या संस्थेचे निमंत्रण पत्र/मान्यता पत्र अर्जास जोडणे अनिवार्य आहे.

७. अर्जदाराने अर्ज नियुक्ती अधिकाऱ्यांच्या (प्राचार्य / संचालक / विद्यापीठ विभाग प्रमुख) मार्फतच पाठवावेत. अर्ज विद्यापीठाने विहीत केलेल्या नमुन्यातच असावा. परिषदेत / कार्यशाळेत सहभागी होण्यापूर्वी किमान ४५ दिवस अगोदर व देशांर्तगत परिषदेला उपस्थित राहण्यासाठी किमान ३० दिवस अगोदर अर्जदाराने अनुदाना करिता करावयाचा अर्ज नियोजन व विकास विभागात सादर करावा. विहित वेळेपूर्वी सादर न केलेल्या व विहित नमुन्यात नसलेल्या व अपुरी माहिती भरलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. एखाद्या संशोधक / शिक्षकांस परिषदेस निमंत्रण प्राप्त झालेले नसले तरी त्यांनी सदर अनुदानासाठी फक्त अर्ज करण्यास हरकत नाही.

८. एखादया अर्जावर समितीने एकदा निर्णय दिला असेल तर सदर निर्णय अर्जदारास मान्य करावा लागेल व एकदा निर्णय घेतलेला अर्ज समितीपुढे पुर्नविचारार्थ ठेवण्यात येणार नाही.

९. अनुदान मंजुर झाल्यानंतर वित्त विभागास आवश्यक ती कागदपत्रे देणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

१०. अर्जदराने Post conference Report अर्जासोबत सादर करावा.

११. या योजनेअंतर्गत अर्ज सादर केल्यानंतर जर काही कारणास्तव अर्जदाराचे परिषदेस जाण्याचे रद्द केले तर सदर अर्जदाराने या विभागास लेखी अथवा pldvp@unipune.ac.in या ई–मेलवर त्वरीत कळवावे.

१२. तरूण संशोधकांना कार्यशाळा/प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कोणताही संशोधन पेपर सादर न करता, सहभागी होण्यासाठी खालील निकषांच्या आधारे अहवाल तयार करून सदर अहवाल प्रस्तावासोबत सादर करावा.

1. Title of the Workshop / Training Programme.
2. Aim and Objectives of the Workshop / Training Programme.
3. Letter of Invitation of the Workshop / Training Programme and deputation letter from the College/Institute/ Department/University.
4. Duration of the Workshop / Training Programme.
5. Name of the organizing Institute / Department.
6. Relevance of the Workshop / Training Programme in respect of –
   a) Teaching, learning, evaluation methodology.
   b) Starting of the New Courses in curriculum.
   c) Staff development.
   d) Career guidance and placement.
   e) Development of experimental skill for the research.
7. Usefulness of the Workshop / Training Programme for teacher impartmenting skills to the students.
8. Upgradation in teaching and presentation, survey, data and analysis of the topic.
9. New innovative concepts.
10. Evaluation of the participant at the end of the Workshop/Training Programme if any.

11. To gain the administrative knowledge, use of Information Communication Technology (ICT) at higher education.
12. Whether participant can share / organized similar kind of workshop/training programme.

**अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावी.**

- आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय परिषदेमध्ये सादर करावयाच्या योग्य अशा नमुन्यातील शोधनिबंधाच्या तीन प्रती तसेच सदर शोधनिबंधाची एक प्रत (पी.डी.एफ. फारमॅटमधे ) pldvp@unipune.ac.in या ई–मेलवर पाठवावी किंवा प्रस्ताव सादर करताना पेन–ड्राईव्हवर घेवून यावी. याव्यतिरिक्त इतर आवश्यक कागदपत्रांची एकच प्रत मूळ प्रस्तावासोबत सादर करावी.
- मागदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावासोबत सर्व कागदपत्रे न जोडल्यास व विहित मुदतीत सादर न केल्यास सदर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.
- सहलेखकाचे ना हरकत प्रमाणपत्र (लागू असल्यास) (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)
- परिषदेचे माहिती पत्रक व परिषद आयोजकाचे निमंत्रण / मान्यता पत्र.
- विद्यापीठ शिक्षक मान्यता पत्राची प्रत (संलग्न महाविद्यालये व संस्थामधील शिक्षकांसाठी)
- वयाचा पुरावा (ज्यामध्ये जन्म दिनांकाची नोंद असेल)
- पूर्वी प्रकाशित केलेल्या संशोधन लेखांची यादी व Bio-data.

**उपकुलसचिव**
**नियोजन व विकास विभाग**

Contact Person :

Dr. Ravindra K. Nalawade
Planning & Development Section
University of Pune
Pune 411007.

Tel. No. : 020-25601265
E-mail : pldvp@unipune.ac.in

**Annexure I**

UNDERTAKING

I certify that,

I Prof./Dr./Mr./ Mrs. ____________________________________________

certify that, I have attended International Conference/Seminar entitled ____________________

____________________________________ at ____________________ from ____________

to ____________ and presented a research paper entitled ____________________________

__________________________________________________________________

in the said Conference / Seminar.

I have not getting any financial assistance (Unassigned Grant or Young Teacher Travel Grant) during the last three years from the University and also I have not getting any financial assistance from the College/Institute or any other agency for attending National/International Conference / Seminar / Symposia / Workshop / Training Programme held abroad or within India. I also certify that, the research paper presented in the above Conference/Seminar has not published earlier in any National or International Journal or Book and nor it was presented or will present in any other conference except above.

The details given above are correct. If the information supplied will found to be incorrect on later date, or in case financial assistance has received from the organizers, from the college or any other agency, I shall refund the entire amount to the University, which will paid to me for International Conference. The money received has been use only for the purpose for which it has requested. I also undertake that I shall abide by the decision of the University.

Date :

Name & Signature of the Applicant

**Annexure II**

## No Objection Certificate by Co-author/s

I/We have no objection to present or publish the research paper entitled______________________________________________

______________________________________________

______________________________________________

on my/our behalf by Prof. /Dr. /Mr. /Mrs. ______________________________

in the International Conference (Title) ______________________________

______________________ held at ______________________.

I/We had not published or will published the same research paper in any National or International Journal or Book and nor I/We presented or will present the same in any other Conference / Seminar.

Date :

Place :

Full Name, Designation & Signature of Co-author/s,
Address of College/Institute